**प्रेसनोट दि.१७/०३/२०१९**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**सिंहगडरोड पो.ठाणे कार्यक्षेत्रातील शांतता कमिटी पोलीस मित्रांची बैठकीअनुषंगाने पोलीसांनी केलेली जनजागृती**

---

आगामी येणारे होळी सण, रंगपंचमी सण तसेच शिवजयंती निमीत्त दि.१६/०३/२०१९ रोजी १८.०० ते १९.०० वा.चे दरम्यान शांतता कमिटी पोलीस मित्रांची सिंहगडरोड पो.ठाणे,पुणे याठिकाणी बैठक आयोजित केलेली होती. बैठकीचे वेळी मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली यांनी दिलेले आदेशाअनुषंगाने मिरवणुक व उत्सवात डी.जे.साऊंड सिस्टीम न लावणेबाबत, आवाजाची मर्यादा ५५ डेसीबलपेक्षा कमी ठेवणेबाबत,विनापरवाना कोणत्याही ठिकाणी मंडप न टाकणेबाबत, आक्षेपार्ह/ बेकायदेशिरपणे बॅनर्स,पोस्टर्स न लावणेबाबत, मुर्ती प्रतिमा संरक्षणासाठी स्वयंसेवक नेमणेबाबत,शिवजयंती मिरवणुक उत्सव सोहळा कार्यक्रमामुळे दैनंदिन सार्वजनिक वाहतुकीस अडथळा होणार नाही यादृष्टीने मार्गदर्शनपर सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर बैठकीस श्री.डी.व्ही.पवार,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,नेम.सिंहगडरोड पो.ठाणे,पुणे यांनी मार्गदर्शन केलेले असुन, त्यावेळी नगरसेवक-श्रीकांत जगताप, १० मंडळांचे कार्यकर्ते, शांतता कमिटीचे श्री.सचिन निवंगुणे,श्री.समिर रुपदे,श्री.शिवा पासलकर व इतर १५ ते २० सदस्य उपस्थित होते. सदरचे बैठकीबाबत उपस्थित मंडळाचे कार्यकर्ते व इतर सदस्य यांनी समाधान व्यक्त केलेले आहे.





**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**सिंहगडरोड पो.स्टेशन,पुणे**